सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४९

# महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१

(१ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला)

# Maharashtra Act No. XLIX of 1971

## The Maharashtra Educational Institutions (Transfer of Management) Act, 1971

*(As Modified upto 1st November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रुपये ४-००]

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९

# महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे — पृष्ठे

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. .. १

२. व्याख्या .. .. .. .. १

**प्रकरण दोन**

**विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांचे व्यवस्थापन हस्तांतरित करणे**

३. शैक्षणिक परिसंस्थांचे अन्वेषण करविण्याचा अधिकार .. .. २

४. निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. २

५. कोणत्याही अन्वेषणात सहाय्याची मागणी करण्याचा व्यक्तींचा किंवा व्यक्तींच्या मंडळाचा अधिकार. ३

६. शैक्षणिक परिसंस्थेचे व्यवस्थापन व नियंत्रण संस्थेकडे हस्तांतरित करण्याचा राज्य
४

शासनाचा अधिकार.

७. परिसंस्थेचे विसर्जन आणि उक्त संस्थेच्या उपक्रमाचे संस्थेकडे हस्तांतरण आणि हस्तांतरणाचे परिणाम. ४

८. उक्त परिसंस्थेच्या कर्मचाऱ्यांसंबंधी तरतुदी .. .. ६

९. हस्तांतरित केलेल्या मालमत्तेचा कब्जा देण्याचे आणि त्याच्याशी संबंधित दस्तऐवज स्वाधीन करण्याचे कर्तव्य. ६

१०. तपशील पुरविण्याचे कर्तव्य. .. .. ६

११. विवक्षित करारातून अंग काढून घेण्याचा परिसंस्थेचा अधिकार .. .. ७

१२. पद गेल्याबद्दल किंवा व्यवस्थापनाचा करार मुदतीआधी समाप्त केल्याबद्दल भरपाई मिळण्याचा अधिकार नसणे. ७

१३. संस्थांना निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. ७

**प्रकरण तीन**

**किरकोळ**

१४. शास्ती .. .. .. .. ७

१५. या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण .. .. .. ८

१६. नियम करण्याचा अधिकार .. .. .. .. ८

१७. सन १८६० चा अधिनियम क्रमांक २१ ची सुधारणा .. .. .. ९

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९[1]

# महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१

[ राष्ट्रपती यांची दिनांक २१ डिसेंबर १९७१ रोजी अनुमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २८ डिसेंबर १९७१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला ].

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१४–४–१९७६)*

**सार्वजनिक हितास हानीकारक असेल अशा रीतीने चालविण्यात येणाऱ्या विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांच्या उपक्रमाच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी आणि उक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या गोष्टींची तरतूद करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** सार्वजनिक हितास हानीकारक असेल अशा रीतीने चालविण्यात येणाऱ्या विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांच्या उपक्रमाच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणे आणि उक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या गोष्टींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्यांच्या बाविसाव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

## प्रकरण १

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण,) अधिनियम, १९७१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो[1] संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस तो अंमलात येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,– व्याख्या.

(अ) "न्यायालय" म्हणजे, बृहन्मुंबईमध्ये, मुंबई नगर दिवाणी न्यायालय, व अन्यत्र मूळ अधिकारिता असलेले मुख्य दिवाणी न्यायालय, आणि त्यामध्ये, वरिष्ठ स्तर न्यायाधीशांचे इतर कोणतेही दिवाणी न्यायालय किंवा राज्य शासनाने या अधिनियमान्वये, न्यायालयाच्या अधिकारितेच्या आर्थिक मर्यादेमध्ये किंवा स्थानिक हद्दीमध्ये, न्यायालयाची कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेल्या न्यायिक अधिकाऱ्याचा समावेश होईल;

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७१, भाग–पाच, असाधारण पृष्ठे ३६३–३६४ (इंग्रजी) पहा.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवतो.

(ब) "शैक्षणिक परिसंस्था" किंवा "परिसंस्था" म्हणजे, (केवळ तेच किंवा इतर कार्याबरोबर) जी माध्यमिक शिक्षण देण्याचे कार्य करीत असेल, अशी कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारी परिसंस्था, आणि तीत, प्राथमिक किंवा पूर्व-प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०, अन्वये नोंदलेल्या शिक्षणशास्त्र विद्यालयाचा समावेश होईल, तसेच त्यात, कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या अशा परिसंस्थेचे विश्वस्त, किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ यांचा समावेश होतो ; १८६० चा २१. १९५० चा २९.

(क) "पूर्व-प्राथमिक शिक्षण" किंवा "प्राथमिक शिक्षण" म्हणजे राज्य शासनाने याबाबतीत व्याख्या केल्याप्रमाणे पूर्व-प्राथमिक किंवा यथास्थिती, 'प्राथमिक शाळेत दिले जाणारे शिक्षण किंवा त्याच्याशी समतुल्य शिक्षण ;

(ड) "माध्यमिक शिक्षण" म्हणजे किशोरकालीन गरजा पुऱ्या करण्यासाठी जे योजण्यात आले असेल आणि जे 'प्राथमिक शिक्षणाच्या निकटनंतर आणि ज्यांचे नियंत्रण भारतात कायद्याने प्रस्थापित करण्यात आलेल्या विद्यापीठाकडून करण्यात येते अशा शिक्षणाच्या निकटपूर्वी देण्यात येत असेल असे सामान्य, तांत्रिक, व्यावसायिक किंवा विशेष शिक्षण (त्यांचा कोणताही एकत्रित अभ्यासक्रम धरून).

## प्रकरण २

### विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांचे व्यवस्थापन हस्तांतरित करणे

शैक्षणिक परिसंस्थांचे अन्वेषण करविण्याचा अधिकार.

३. कोणतीही शैक्षणिक परिसंस्था सार्वजनिक हितास हानीकारक ठरेल अशा रीतीने चालविण्यात येत आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास, त्या प्रयोजनासाठी शासन नेमील अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींच्या मंडळांकडून, अशा प्रकरणाच्या परिस्थितीचे अन्वेषण करता किंवा करविता येईल. उक्त व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या मंडळाने अन्वेषण केल्यानंतर, त्या बाबतीतील आपला अहवाल राज्य शासनाकडे सादर केला पाहिजे. असे अन्वेषण करताना, परिसंस्थेच्या प्रभारी व्यक्तीस, अशा अन्वेषणाच्या बाबतीतील कोणत्याही बाबीच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे.

निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

४. (१) कलम ३ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असे कोणतेही अन्वेषण केल्यानंतर किंवा करविल्यानंतर आणि त्या कलमान्वये सादर करण्यात आलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, सार्वजनिक हितासाठी या कलमान्वये कार्यवाही करणे इष्ट आहे, अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास, परिसंस्थेमध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या प्रयोजनासाठी, किंवा शिक्षकांची क्षमता सुनिश्चित करण्यासाठी किंवा परिसंस्थेत शिस्त राखण्यासाठी किंवा अशा निदेशांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा नमूद केलेल्या रीतीने परिसंस्थेच्या उपक्रमांचा कारभार किंवा व्यवस्थापन सुधारण्यांच्या प्रयोजनासाठी, किंवा ज्या बाबींमुळे सार्वजनिक हिताचे संवर्धन होईल किंवा संवर्धन होण्याचा संभव असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी राज्य शासनास त्या परिस्थितीत समुचित वाटतील असे निदेश शैक्षणिक परिसंस्थेला देता येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, असे निदेश पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी देता येतील :—

(अ) परिसंस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या पाच तारखेच्या आत किंवा त्या तारखेस, वेतन देण्यास परिसंस्थेस फर्मावणे ; किंवा तिला याबाबतीत विहित करण्यात येईल अशा रीतीने वेतन-बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्यास, वेतनाची संपूर्ण रक्कम (त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा कायद्यानुसार प्राधिकृत केलेल्या वजातीव्यतिरिक्त कोणत्याही वजाती न करता) देण्यास फर्मावणे ;

(ब) राज्य शासनाने परिसंस्थेच्यासंबंधी वेळोवेळी ठरवून दिलेला शैक्षणिक दर्जा कायम राहील हे सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी आणि तिचा कारभार व व्यवस्थापन कार्यक्षम ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या विहीत अर्हता धारण करणारा अध्यापक वर्ग नेमण्यास परिसंस्थेस फर्माविणे; आणि त्यानुसार अशा निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत अशा अर्हता धारण करीत नसलेल्या कोणत्याही व्यक्तीची सेवा किंवा कोणत्याही व्यक्तींच्या सेवा समाप्त करण्यात परिसंस्थेस फर्माविणे;

(क) परिसंस्थेचा कारभार सुरळीत व सुव्यवस्थित चालावा म्हणून, उक्त परिसंस्थेचे कामकाज चालविणाऱ्या व्यक्तीमध्ये कोणताही विवाद किंवा मतभेद टाळण्यास परिसंस्थेस फर्माविणे, आणि त्या प्रयोजनासाठी, अशा निदेशात परिसंस्थेने करावयाच्या कार्यवाहीचा निर्देश करणे;

(ड) पुरेशी व योग्य जागा, फर्निचर, लेखनसामग्री, साधनसामाग्री व इतर सोयी आणि परिसंस्थेच्या उपक्रमाच्या कार्यक्षम कारभारासाठी किंवा व्यवस्थापनासाठी आवश्यक असतील अशा आणि अशा निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या इतर गोष्टी यांची तरतूद करण्यास परिसंस्थेस फर्माविणे;

(ई) परिसंस्थेत प्रवेश मिळण्यासाठी किंवा वरच्या वर्गात चढवण्यासाठी किंवा इतर कोणत्याही विशेष लाभासाठी कोणत्याही विद्यार्थ्याकडून किंवा त्याच्यावतीने, एकतर रोख रकमेत किंवा वस्तुरुपाने, कोणतेही अंशदान, देणगी किंवा कोणत्याही प्रकारचे प्रदान यांची प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मागणी न करण्यास फर्माविणे;

(फ) राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने किंवा राज्य शासनाने याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या शिक्षण उप-संचालकाच्या पदापेक्षा कमी पदाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने वेळोवेळी दिलेल्या अनुदेशांचे पालन करण्यास परिसंस्थेस फर्माविणे;

(ग) परिसंस्थेच्या कामावर परिणाम होईल अशी, उक्त संस्थेच्या निधीची अफरातफर किंवा अपयोजन याचा अंतर्भव असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी, निदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व उपाययोजना किंवा कारवाई करण्यास परिसंस्थेस फर्माविणे;

(३) या कलमान्वये दिलेल्या प्रत्येक निदेशात, ज्या कालावधीत त्या निदेशाचे पालन करण्यात आले पाहिजे कालावधीत विनिर्दिष्ट केली पाहिजे. प्रकरणाच्या परिस्थितीनुसार कालावधीत वाढ करणे आवश्यक असेल तर राज्य शासनास वेळोवेळी अशा कालावधीत वाढ करता येईल;

कोणत्याही अन्वेषणात सहाय्याची मागणी करण्याचा व्यक्तींचा किंवा व्यक्तींच्या संस्थाचा अधिकार

५. (१) कलम ३ अन्वये कोणतेही अन्वेषण करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या संस्थास, राज्य शासनाच्या मान्यतेने, तिला किंवा त्याला अन्वेषणाच्या कामी मदत करण्यासाठी, अन्वेषणासंबंधीच्या कोणत्याही बाबीचे विशेष ज्ञान असणाऱ्या एका व्यक्तीची किंवा अनेक व्यक्तींची निवड करता येईल;

(२) अशा रीतीने नेमण्यात आलेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या संस्थास, शपथेवर (जी देवविण्याचा अधिकार त्यास याद्वारे देण्यात येत आहे) साक्ष घेण्याच्या आणि साक्षीदारांना हजर राहून कागदपत्र व महत्वाच्या वस्तू सादर करण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनासाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील, आणि अशी व्यक्ती किंवा व्यक्तीचे संस्था हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ चे कलम चे १९५, व प्रकरण ३५ याच्या सर्व प्रयोजनासाठी, दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल;

१९०८ चा ५. १८९८ चा ५.

शैक्षणिक परिसंस्थेचे व्यवस्थापन व नियंत्रण संस्थेकडे हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

६. (१) राज्य शासनाच्या मते –

(अ) ज्या परिसंस्थेला कलम ४ ला अनुसरुन निदेश देण्यात आले आहेत त्या परिसंस्थेने , अशा निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, अशा निदेशांचे पालन करण्यात कसूर केली असेल, किंवा

(ब) जिच्या संबंधात कलम ३ अन्वये अन्वेषण करण्यात आले आहे आणि (कलम ४ ला अनुसरून कोणतेही निदेश देण्यात आलेले आहेत) अशी परिसंस्था, तिला किंवा सार्वजनिक हितास हानीकारक असेल अशा रीतीने आपल्या उपक्रमाचे व्यवस्थापन करीत असेल तर,

राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अशा अधिसूचनेच्या तारखेच्या (यात यापुढे जिचा नेमलेली तारीख असा निर्देश करण्यात आला आहे) निकटपूर्वी अशा परिसंस्थेकडे निहित असलेले, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या परिसंस्थेच्या (यात यापुढे जिचा "उक्त परिसंस्था" असा निर्देश करण्यात आला आहे) उपक्रमांचे संपूर्ण व्यवस्थापन व नियंत्रण हे, उक्त परिसंस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे सातत्य चालू राहावे या दृष्टीने संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये असलेल्या प्रयोजनाकरिता रचना केलेल्या संस्थेकडे (यात या पुढे जिचा "उक्त संस्था" असा निर्देश करण्यात आला आहे) हस्तांतरित व निहित करण्यात यावे. १८६० चा २१.

(२) उक्त संस्थेमध्ये इतर संदस्यांबरोबरच राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील अशा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल आणि जर उक्त परिसंस्था, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०, खंड (१) च्या तरतुदी लागू असतील अशी परिसंस्था असेल तर ती नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी ज्यांच्याकडून उक्त परिसंस्थेचे व्यवस्थापन करण्यात येत असेल अशा अल्पसंख्य जमातीतील बहुसंख्य व्यक्तींची (शासकीय अधिकारी धरून) मिळून बनलेली असेल.

(३) राज्य शासनाने विहित करण्यात येईल अशा ठिकाणी आणि अशा रीतीने, अशा अधिसूचनेचा सारांश प्रसिध्द करविला पाहिजे.

परिसंस्थेचे विसर्जन आणि उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचे संस्थेकडे हस्तांतरण आणि हस्तांतरणाचे परिणाम.

७. (१) नेमलेल्या तारखेपासून.–

(अ) उक्त परिसंस्था, विसर्जित होईल; आणि या नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी उक्त परिसंस्थेचा जो उपक्रम तिच्या स्वाधीन किंवा तिच्याकडे निहित असेल तो उपक्रम, त्याच्या व्यवस्थापनाच्या आणि नियंत्रणाच्या प्रयोजनांसाठी, उक्त संस्थेकडे हस्तांतरित होईल आणि ज्या प्रयोजनांसाठी उक्त संस्थेची रचना करण्यात आली असेल त्या प्रयोजनांसाठी, त्याच उपयोग करण्यात येईल किंवा उपयोजन करण्यात येईल;

(ब) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, उक्त परिसंस्थेचे व्यवस्थापन ज्यांच्याकडे सोपविण्यात आले असेल असे विश्वस्त , शासक, संचालक, परिषद, समिती किंवा नियामक मंडळ म्हणून पद धारण करणाऱ्या व्यक्ती धरून व्यवस्थापनाचा प्रभार असलेल्या सर्व व्यक्तींनी अशा प्रकारे आपली पदे रिकामी केल्याचे समजण्यात येईल;

(क) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचे कामकाज चालविण्यासंबंधी , उक्त परिसंस्था आणि कोणतीही व्यक्ती यांच्यामध्ये व्यवस्थापनासंबंधी कोणताही करार झालेला असल्यास, तो संपुष्टात आल्याचे समजण्यात येईल;

(ड) उक्त संस्थेने, उक्त परिसंस्थेचा जीवर हक्क असेल किंवा तिचा हक्क असल्याचे दिसून येईल अशी, उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचा भाग असलेली सर्व मालमत्ता, चीजवस्तू आणि कारवाईयोग्य मागणी हक्क, आपल्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली घेण्यासाठी आवश्यक असेल अशी सर्व उपाययोजना केली पहिजे आणि अशी सर्व मालमत्ता आणि चीजवस्तू नेमलेल्या तारखेपासून उक्त संस्थेच्या अभिरक्षेत असल्याचे समजण्यात येईल.

(२) उक्त परिसंस्थेच्या उपक्रमात, सर्व हक्क, मत्ता, सांविधिक भाडेदारी, असल्यास ती धरून पट्टेदारी, अधिकार प्राधिकार आणि विशेषाधिकार आणि जमिनी, वसतिगृहे धरून इमारती, बांधकामे, वाचनालये, प्रयोगशाळा, उपकरणे, साधनसामग्री, फर्नीचर, लेखनसामाग्री, भांडारे, मोटारी व इतर वाहने असल्यास ती वाहने व उक्त परिसंस्थेचा उपक्रम चालविण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर गोष्टी धरून सर्व जंगम व स्थावर मालमत्ता, रोख शिल्लक रक्कम, हातची रोकड, राखीव निधी असल्यास, तो राखीव निधी, गुतवंणुका व पुस्तकी ऋणे आणि नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, उक्त परिसंस्थेच्या मालकीच्या, कब्जातील, अधिकारातील वा नियंत्रणाधीन असलेल्या मालमत्तेतून उद्‌भवणारे इतर सर्व हक्क हितसंबंध व त्यासंबंधीची सर्व लेखा पुस्तके नोंदवह्या, नकाशे, योजना व इतर सर्व अभिलेख मग ते कोणत्याही स्वरूपाचे असोत, यांचा समावेश असल्याचे मानण्यात येईल. तसेच उक्त परिसंस्थेची त्यावेळी अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व कोणत्याही स्वरूपाचे आबंधन यांचाही समावेश असल्याचे मानण्यात येईल.

(३) या कलमान्वये संस्थेकडे हस्तांतरित आणि संलग्न होतील अशी सर्व ऋणे आणि दायित्वे, नेमलेल्या तारखेनंतर, संस्थेकडून चुकती करण्यात आणि फेडण्यात येतील.

(४) ज्यामध्ये उक्त परिसंस्थेच्या नावे दिलेले कोणतेही मृत्यूपत्रित दान, देणगी किंवा विश्वस्त व्यवस्था अंतर्भूत असेल असे कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर केलेले किंवा करून दिलेले असोत, त्याचा, नेमलेल्या तारखेपासून, उक्त परिसंस्थेऐवजी उक्त संस्थेचे नाव असल्याप्रमाणे, अर्थ लावण्यात येईल.

(५) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेले आणि उक्त परिसंस्थेच्या उपक्रमावर परिणाम करणारे सर्व करार आणि कामकाज व्यवस्था या, उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाशी जेथवर त्यांचा संबंध येत असेल, तेथवर, उक्त परिसंस्थेविरूध्द किंवा जी व्यक्ती त्याबद्दल जामीन राहिली असेल किंवा त्याच्या पालनासंबंधी जिने हमी दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीविरूध्द अंमलात असण्याचे बंद होईल किंवा उक्त परिसंस्था किंवा व्यक्ती यांच्याविरूध्द उक्त करार किंवा व्यवस्था बजावणीयोग्य असणार नाही आणि उक्त परिसंस्थेऐवजी त्यामध्ये त्या संस्थेचे नाव असल्याप्रमाणे त्या पूर्णपणे प्रभावी व परिणामक्षम असतील आणि त्याप्रमाणे उक्त करार किंवा व्यवस्था, पूर्णतः व परिणामकारकरीत्या बजावता येतील.

(६) या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या इतर तरतुदींना अधीन राहून, उक्त परिसंस्थेद्वारे किंवा तिच्याविरुध्द, नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही किंवा विद्यमान दाव्याचे कारण, अशा नेमलेल्या तारखेपासून, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर उक्त परिसंस्थेद्वारे किंवा तिच्याविरुध्द, ज्या रीतीने उक्त कार्यवाही चालू ठेवता आली असती किंवा दाव्याचे कारण अमंलात आणता आले असते त्याच रीतीने, त्या संस्थेद्वारे किंवा तिच्या विरुध्द, चालू ठेवता येईल आणि अमंलात आणता येईल आणि उक्त परिसंस्था, तिचा जामीनदार किंवा हमीदार यांच्यकडून अंमलात आणण्याचे किंवा त्यांच्या विरुध्द अंमलात असल्याचे बंद होईल.

उक्त परिसंस्थेच्या कर्मचाऱ्या-संबधी तरतुदी.

८. नेमलेल्या तारखेच्या लगतपूर्वी उक्त परिसंस्थेच्या नोकरीत असलेल्या प्रत्येक कर्मचारी (अध्यापक वर्गाचा सदस्य धरून), उक्त परिसंस्थेच्या कारभारासंबंधात असा कर्मचारी नोकरीवर असेल तेथवर, अशा तारखेपासून, उक्त संस्थेचा कर्मचारी होईल आणि हा अधिनियम पारित झाला नसता तर, उक्त परिसंस्थेखालील पद त्याने ज्या मुदतीसाठी, ज्या पारिश्रमिकावर आणि ज्या अटींवर व शर्तीवर धारण केले असते त्याच मुदतीसाठी, त्याच पारिश्रमिकावर आणि त्याच अटींवर व शर्तीवर तो आपले पद धारण करील आणि निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान, असल्यास, ते उपदान, आणि इतर बाबी यांबाबत उक्त परिसंस्थेच्या अधीन जे अधिकार व विशेषाधिकार त्यास मिळाले असते. तेच अधिकार व विशेषाधिकार त्यास प्राप्त होतील आणि त्या संस्थेअधीन असलेली त्याची नोकरी समाप्त झाल्याशिवाय आणि समाप्त होईपर्यंत, (आणि राज्य शासनाच्या संमतीने अशी नोकरी समाप्त करण्याचा अधिकार त्या संस्थेस याद्वारे देण्यात आला आहे) किंवा त्याचे पारिश्रमिक, अटी व शर्ती यांमध्ये त्या संस्थेकडून रीतसर बदल करण्यात येईपर्यंत तो आपले पद धारण करण्याचे चालू ठेवील ;

परंतु, अशा रीतीने करण्यात आलेल बदल अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास स्वीकार्य नसतील तर, कायम कर्मचाऱ्याच्या बाबतीत, तीन महिन्यांच्या पारिश्रमिकाएवढी भरपाई आणि इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, एक महिन्याच्या पारिश्रमिकाएवढी भरपाई, संस्थेकडून त्याला देण्यात आल्या नंतर, त्या संस्थेस त्याची नोकरी समाप्त करता येईल.

आणखी असे की, ज्या कोणत्याही कर्मचाऱ्याने, नेमलेल्या दिवसाच्या लगत पूढील तीस दिवसाच्या आत किंवा याबाबतीत संस्था विनिर्दिष्ट करील अशा आणखी कालावधीत, उक्त संस्थेचा कर्मचारी न होण्याचा आपला हेतू संस्थेला, लेखी नोटीशीद्वारे, कळविला असेल अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, लागू होणार नाही.

हस्तांतरित केलेल्या मालमत्तेचा कब्जा देण्याचे आणि त्याच्याशी संबंधित दस्तऐवज स्वाधीन करण्याचे कर्तव्य

९. (१) उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचा भाग असलेली कोणतीही मालमत्ता, कलम ७ अन्वये त्या संस्थेकडे हस्तांतरीत झाल्यास, जिच्या कब्जात किंवा अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली मालमत्ता असेल अशा प्रत्येक व्यक्तीने उक्त मालमत्ता ताबडतोब संस्थेच्या स्वाधीन केली पाहिजे.

(२) संस्थेकडे हस्तांतरीत झालेल्या उक्त परिसंस्थेच्या उपक्रमांशी संबंधित असलेली जी कोणतीही पुस्तके, दस्तऐवज किंवा इतर कागदपत्रे, उक्त संस्थेच्या त्या उपक्रमाचा एक भाग असतील आणि उक्त परिसंस्था ही उक्त संस्थेकडे हस्तांतरित झाली नसती तर जी याप्रमाणे त्या उपक्रमाचा एक भाग झाली असती, ज्या कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा तिच्या नियंत्रणाखाली असतील ती व्यक्ती त्या उक्त पुस्तकांचा, दस्तऐवजांचा व कागदपत्रांचा हिशेब संस्थेला देण्यास जबाबदार असेल आणि त्या व्यक्तीने ती पुस्तके , दस्तऐवज किंवा इतर कागदपत्रे, उक्त संस्था याबाबत विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीकडे सोपवली पाहिजेत.

तपशील पुरविण्याचे कर्तव्य.

१०. उक्त परिसंस्थेने, राज्य शासन याबाबतीत मान्य करील अशा कालावधीत, नेमलेल्या तारखेच्या लगतपूर्वी उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचा भाग असणारी सर्व मालमत्ता आणि मत्ता (पुस्तकी ऋणे असल्यास ती ऋणे, गुंतवणुका आणि मालकीच्या वस्तू यांचा तपशील धरून), नेमलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या उक्त परिसंस्थेच्या उपक्रमासंबंधीची सर्व दायित्वे आणि भार यांची आणि तसेच या कलमाच्या अंमलातून संस्था वगळील अशा करारांव्यतिरीक्त, या अधिनियमाच्या आधारे ज्या करारान्वये संस्थेची दायित्वे निर्माण झाली असतील किंवा निर्माण होतील किंवा निर्माण होऊ शकतील असे उक्त संस्थेच्या कोणत्याही नोकराची रजा, निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी, उपदान असल्यास ते उपदान, किंवा त्याच्या सेवेच्या, इतर अटी यासंबंधीचे, स्पष्ट किंवा गर्भित अर्थाचे करार धरून, उक्त परिससंस्थेद्वारे किंवा तिच्या वतीने करण्यात आलेले आणि अशा नेमलेल्या तारखेस अंमलात असलेले सर्व करार यांची परिपूर्ण सूची उक्त संस्थेस दिली पाहिजे आणि या प्रयोजनासाठी उक्त संस्थेने उक्त परिसंस्थेला सर्व सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

११. (१) ज्या करारान्वये उक्त परिसंस्थेची दायीत्वे निर्माण झाली असतील किंवा निर्माण होतील किंवा निर्माण होऊ शकतील असा कोणताही करार करणे, उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाच्या प्रयोजनासाठी, वाजवीरीत्या आवश्यक नव्हते किंवा जो सद्‌भावनेने करण्यात आलेला नाही असे उक्त संस्थेला आढळून येईल त्याबाबतीत, संस्थेस, नेमलेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत करारातून मुक्त करण्याबद्दल न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि न्यायालयाची, त्याबाबतीत योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, उक्त परिसंस्थेचा उपक्रम चालविण्याचा प्रयोजनाकरिता, करार करणे वाजवीरील्या आवश्यक नव्हते किंवा तो सद्‌भावनेने करण्यात आला नाही त्याबद्दल खात्री झाली तर, त्यास लादणे योग्य वाटेल अशा अटींवर, करार रद्द करणारा किंवा त्यात बदल करणारा, आदेश देता येईल आणि त्यानंतर तो करार तद्‌नुसार अंमलात येईल.

विवक्षित करारातून अंग काढून घेण्याचा संस्थेचा अधिकार.

(२) या कलमान्वये रद्द करण्यात किंवा बदल करण्यात येणाऱ्या करारातील सर्व पक्षकाराना, त्या कार्यवाहीतील पक्षकार करण्यात येईल.

१२. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी, कलम ७, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही पद धारण करण्याचे बंद झाले असेल किंवा त्या पोटकलमाच्या खंड (क) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीमुळे जिचा व्यवस्थापनाचा करार समाप्त झाला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, पद गेल्याबद्दल किंवा तिच्या व्यवस्थापनाचा करार मुदतीपूर्वी समाप्त झाल्याबद्दल कोणतीही भरपाई मागण्याचा हक्क असणार नाही.

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशा भरपाईच्या रूपाने नव्हे तर अन्यथा उक्त परिसंस्थेकडून वसूलीयोग्य असलेला पैसा वसूल करण्याच्या अशा कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारास बाधा पोहोचणार नाही.

पद गेल्या-बद्दल किंवा व्यवस्थापना-चा करार मुदती अधी समाप्त केल्याबद्दल भरपाई मिळण्याचा अधिकार नसणे

१३. राज्य शासनास, त्यास योग्य आणि आवश्यक वाटतील असे निदेश संस्थेला देता येतील आणि संस्थेने त्या निदेशांचे पालन केले पाहीजे.

संस्थांना निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

## प्रकरण तीन

## किरकोळ

१४. (१) जी कोणतीही व्यक्ती —

शास्ती.

(अ) तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली उक्त परिसंस्थेच्या उपक्रमाचा भाग असलेली कोणतीही मालमत्ता, संस्थेस किंवा उक्त परिसंस्थेचा कारभार चालविण्यासाठी तिच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्याचे अन्यायाने रोखून ठेवील; किंवा

(ब) ज्या पारिसंस्थेचे व्यवस्थापन आणि नियंत्रण या अधिनियमान्वये उक्त संस्थेकडे हस्तांतरित होईल अशा परिसंस्थेच्या उपक्रमाचा भाग असणारी कोणतीही मालमत्ता अन्यायाने कब्जात घेईल ;

(क) तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असतील असे कोणतेही दस्तऐवज, कलम ९ च्या पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे संस्थेला किंवा त्या संस्थेकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीला देण्याचे हेतुपुरस्सर रोखून ठेवील किंवा ते पुरविण्यात कसूर करील; किंवा

(ड) कलम १० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सूची पुरविण्यात हेतुपुरस्सर कसूर करील ; किंवा

(इ) अशी सूची पुरविणे आवश्यक असेल तेव्हा, तीत जो खोटा असेल आणि जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा जो खोटा असल्याचा तिचा समज असेल किंवा तो खरा असल्याचे तिला वाटत नसेल असा कोणताही तपशील पुरवील; किंवा

(फ) या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे रीतसर पालन करण्यास कोणत्याही व्यक्तीस हेतुपुरस्सर अडथळा करील;

त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतका मुदतीची कैदेची किंवा दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

परंतु, या पोट-कलमाच्या खंड (अ) किंवा (ब) अन्वये कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयास, आरोपी व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्याच्या वेळी, अन्यायाने रोखून ठेवलेली किंवा अन्यायाने मिळविलेली कोणतीही मालमत्ता किंवा हेतुपुरस्सर रोखून ठेवलेले किंवा न पुरवविलेले कोणतेही दस्तऐवज, न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत, स्वाधीन करण्याबद्दल किंवा परत करण्याबद्दल आदेश देता येईल;

आणखी असे की, या कलमात किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, नेमलेल्या तारखेपूर्वी एखाद्या व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधातील अपराधाबद्दल उक्त व्यक्ती सिद्धापराध ठरणार नाही.

(२) कोणत्याही न्यायालयाने राज्य शासनाच्या किंवा त्या शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजूरीने असेल त्याशिवाय, या कलमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेता कामा नये.

या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण.

१५. या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल संस्थेविरुद्ध किंवा संस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार

१६. (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करता येतील आणि त्यांत अशी प्रयोजने पार पाडण्यासाठी फी आकारण्यासंबधीची तरतूद करता येईल.

(२) राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितका लवकर, राज्य विधान मंडळाच्या एका अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास किंवा तो करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, असा नियम यथास्थिती, फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये त्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

१७. संस्था नोंदणी अधिनियम, १८६० यामध्ये कलम २० नंतर पुढील नवीन कलमे समाविष्ट करण्यात येतील :- सन १८६० चा अधिनियम क्र. २१ ची सुधारणा

[१] [२०अ] या अधिनियमच्या प्रयोजनासाठी 'विशेष संस्था' म्हणजे शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१ याच्या प्रयोजनासाठी स्थापन केलेली संस्था. विशेष संस्थेची व्याख्या

[१][२०ब] राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदी— विशेष संस्थांच्या बाबतीत अधिनियमात रूपभेद करण्याचा अधिकार.

(अ) विशेष संस्थेस लागू होणार नाहीत, किंवा

(ब) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अपवाद, फेरबदल आणि अनुकूलन यासह ते विशेष संस्थेस लागू होतील,

असा निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्याचे योजिलेल्या प्रत्येक अधिसूचनेची प्रत राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू असताना, तीस दिवसांच्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, मसुद्याच्या स्वरूपात ठेवण्यात येईल. आणि त्या मुदतीत कोणतेही सभागृह अधिसूचना काढण्यास मान्यता देणार नाही किंवा फेरबदल करूनच ती काढण्यास मान्यता देईल तर, अशी अधिसूचना काढण्यात येणार नाही किंवा त्याप्रकरणी आवश्यक असेल त्या प्रमाणे, दोन्ही सभागृहे कबूल होतील अशा फेरबदलासह अशी अधिसूचना काढण्यात येईल".

---

१ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११, कलम ३, दुसरी अनूसूची अन्वये संस्था नोंदणी अधिनियम, १८६० ची नवीन कलमे २१ व २२ यांना अनुक्रमे २०अ आणि २०ब असे फेर क्रमांक देण्यात आले.

शा. मु. औ.-एच २६८-६०५० पुस्तके-११-२००६

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.